सकाळ

# स्वातंत्र्यसंग्रामातील कामगार योद्धा

**महात्मा गांधींनी १९३० च्या सुरुवातीला पुकारलेल्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत संपूर्ण देशाला हादरवून टाकणारी घटना मुंबईत घडली होती. विदेशी वस्तू वाहून नेणाऱ्या ट्रकसमोर बाबू गेनू आडवे झाले आणि हे आंदोलन चिरडण्यासाठी ब्रिटिश अधिकाऱ्याने ट्रक बाबू गेनू यांच्या अंगावर चालवला. स्वदेशी आंदोलनात आपल्या प्राणाची आहुती देऊन बाबू गेनू हुतात्मा झाले, त्या घटनेला आज ९३ वर्षे झाली. त्यानिमित्त...**

रवीराज इळवे

**स्थळ :** काळबादेवी बाजार, मुंबई. तारीख : १२ डिसेंबर १९३०. वेळ : सकाळी ११ वाजताची. ब्रिटिश वस्तूंवर बहिष्कार टाकण्याच्या आंदोलनाचा भाग म्हणून जमाव एकत्र आला होता. त्यातील एक २२ वर्षीय तरुण ब्रिटिश माल वाहून नेणाऱ्या ट्रकला रोखण्यासाठी निग्रहाने ट्रकसमोर आडवा झाला होता... स्वदेशी आंदोलनाची पूर्वकल्पना असल्याने पोलिस बंदोबस्त तैनात होता. आंदोलकांना हटवण्याचा प्रयत्न पोलिस करत होते; मात्र महात्मा गांधींच्या विचारांनी भारावलेला हा तरुण काही केल्या हटत नव्हता. विदेशी मालाने भरलेला ट्रक तो पुढे जाऊ देत नव्हता. रागाने लालबुंद झालेला गोरा सार्जंट त्या तरुणावर ट्रक चढवून पुढे जा, असे ट्रकचालकाला दरडावून सांगत होता; मात्र चालकाने तसे करण्यास स्पष्ट नकार दिल्याने गोरा सार्जंट अधिकच भडकला. त्याने स्वतः ट्रकच्या स्टेरिंगचा ताबा घेतला आणि हे आंदोलन चिरडण्यासाठी त्या तरुणाच्या अंगावर ट्रक चढवला. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या, ट्रकखाली चिरडला गेलेला हा तरुण रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. आंदोलकांनी त्याला जवळच्या जी. टी. हॉस्पिटलात हलवले; मात्र तरुणाचा उपचारांदरम्यान मृत्यू झाला.



हुतात्मा बाबू गेनू

गोऱ्या सार्जंटच्या या निर्दयी कृत्याची बातमी मुंबईत वाऱ्यासारखी पसरली. तणाव निर्माण झाला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत ब्रिटिश सरकारने या तरुणाचा मृत्यू हा एक अपघात असल्याचे भासवून पोलिस दप्तरी तशी नोंद केली; मात्र त्यामुळे लोकांमध्ये अधिकच असंतोष निर्माण झाला. मोठ्या संख्येने लोक रस्त्यावर उतरले. ज्या ठिकाणी या तरुणाचे रक्त सांडले होते, तेथे जमले. गोऱ्या सार्जंटने केवळ त्या तरुणाला चिरडले नव्हते, तर भारतीयांच्या भावनांचा, अस्मितेचा आणि मानवी अधिकारांचा निर्दयीपणे चेंदामेंदा केला होता. स्वदेशी आंदोलनाचा पहिला बळी ठरून हौतात्म्य पत्करलेला हा तरुण होता एक गिरणी कामगार बाबू गेनू. ज्याने भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आपल्या प्राणाची आहुती देऊन हौतात्म्य पत्करले आणि हुतात्मा बाबू गेनू म्हणून संपूर्ण देशात ओळखला गेला.

त्या काळात गिरणी कामगारांची नावे केवळ नाव आणि वडिलांचे नाव अशा पद्धतीने लिहिली जायची. आडनाव लिहिण्याची पद्धत नव्हती. बाबू गेनू यांचे संपूर्ण नाव बाबू गेनबा सैद असे होते. पुणे जिल्ह्याच्या आंबेगाव तालुक्यातील महाळुंगे पडवळ गावच्या बाबू गेनूंचे पितृछत्र वयाच्या दुसऱ्या वर्षीच हरपले होते. अत्यल्प भूधारक कोरडवाहू शेतकरी कुटुंबातल्या बाबू गेनूंना कुटुंबीयांच्या उदरनिर्वाहासाठी लहान वयातच काम करण्याशिवाय पर्याय नव्हता. आईपाठोपाठ बाबू गेनूंनादेखील उदरनिर्वाहासाठी गाव सोडून मुंबईला यावे लागले. अशाही परिस्थितीत स्वतःच्या, आपल्या कुटुंबाच्या पलीकडे पाहण्याची दृष्टी त्यांनी अल्लड वयात आत्मसात केली होती.

लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर महात्मा गांधींनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व स्वीकारले होते. त्यांच्या विचारांनी संपूर्ण देश भारावलेला होता. मीठ हे सर्वसामान्य माणसाच्या आहारातील महत्त्वाचा घटक असल्याने त्यावर कर लावणे तसेच मीठ बनवण्यासाठी सरकारची मक्तेदारी असणे अन्यायकारक आहे, त्यामुळे हा कायदा रद्द करावा, अशी मागणी महात्मा गांधींनी ब्रिटिश सरकारकडे केली. ती सरकारने फेटाळली आणि म्हणूनच ब्रिटिश सरकारचे अन्यायकारक व जुलमी कायदे शांतता, अहिंसा आणि सत्याग्रह या मार्गाने मोडण्याच्या उद्देशाने १२ मार्च १९३० रोजी गांधीजींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. याअंतर्गत प्रामुख्याने मिठाचा सत्याग्रह, जंगल सत्याग्रह आणि परदेशी मालावर बहिष्कार व स्वदेशीचा आग्रह यासाठी आंदोलने करण्यात आली.

मुंबई हे स्वातंत्र्य लढ्याचे एक महत्त्वाचे केंद्र होते. गिरणी कामगार म्हणून काम करीत असताना महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित होऊन मुंबईतील वडाळा येथे मिठाच्या सत्याग्रहात सहभागी झालेल्या बाबू गेनूंना सक्तमजुरीची शिक्षा झाली होती; परंतु शिक्षा भोगून आल्यानंतरदेखील चळवळीतील सहभागाचा त्यांचा निग्रह तसूभरही कमी झाला नाही. स्वदेशीच्या लढ्यात तर त्यांनी आपले प्राण अर्पण करून सर्वोच्च बलिदान दिले.

हुतात्मा बाबू गेनूंनी देशासाठी दिलेल्या बलिदानाचे स्मरण म्हणून काळबादेवी परिसरात ज्या ठिकाणी १२ डिसेंबर १९३० रोजीची घटना घडली होती, त्या रस्त्याला राज्य सरकारने 'हुतात्मा बाबू गेनू मार्ग' असे नाव दिले आहे. भारत सरकारनेदेखील नवी दिल्लीतील आर. के. पूरम परिसरातील एका रस्त्याला 'अमर शहीद बाबू गेनू मार्ग' असे नाव दिले आहे. याशिवाय आंबेगाव तालुक्यातील घोडनदीवरील डिंभे धरणाच्या जलाशयाचे नामकरण 'हुतात्मा बाबू गेनू जलाशय' असे केले. महाळुंगे पडवळ येथे हुतात्मा स्मारक उभारण्यात आले आहे. स्वातंत्र्य संग्रामातील या कामगार योद्ध्याच्या सन्मानार्थ महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या प्रभादेवी (पूर्वीचे एल्फिन्स्टन) येथील कामगार क्रीडा भवनाचा 'हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन' असा नामविस्तार करण्यात आला आहे.

**(लेखक महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे आयुक्त आहेत.)**